Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारण करणारे घटक : एक अभ्यास

**जाधव विश्वजीत हणमंतराव**
संशोधक
(एम.ए. राज्यशास्त्र, बी.एड्., सेट)

**डॉ. पी. डी. सुर्यवंशी**
मार्गदर्शक
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा.सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय
पुर्णा जि. परभणी

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण असो त्यावर नैसर्गिक घटक किंवा मानव निर्मित घटकातील अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांचा प्रभाव पडत असतो. अंतर्गत घटकामध्ये भौगोलिक परिस्थिती, सांस्कृतिक वसा, तंत्रज्ञानाचा विकास, लष्करी सुसज्जता, सामाजिक संरचना, राष्ट्रीय सामर्थ्य, राष्ट्र राज्याची विचारधारा, इंटरनेट आणि त्यावरील सामाजिक माध्यमांचा फैलाव, राज्यव्यवस्थेचा प्रकार, राष्ट्राचे नेतृत्व तर बाह्यघटकांमध्ये जागतिकपरिस्थिती, शत्रू पक्षाचे लष्करी सामर्थ्य आणि लोकमत या घटकांचा पराष्ट्र धोरणावर परिणाम होत असतो. या घटकांचा विस्तारीत आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारताचे पराष्ट्र धोरण निर्धारणांच्या घटकांचा अभ्यास करणे.
२. भारताच्या परराष्ट्र धोरणावर बाह्य घटकांचा होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, सांख्यिकीय इत्यादी संशोधन पद्धती आहेत. तसेच भारताचे पराष्ट्र धोरण निर्धारणांच्या घटकांचा अभ्यास हा विषय ऐतिहासिक असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**भारताचे पराष्ट्र धोरण निर्धारणांचे घटक**

**भौगोलिक परिस्थिती**

भौगोलिक आकाराचा परराष्ट्र धोरणावर स्वाभाविक परिणाम होतो. सर्वसाधारण धारणेनुसार राष्ट्र राज्याचा भौगोलिक आकार जेवढा जास्त तेवढा आंतरराष्ट्रीय राजकारणात त्या राष्ट्राचा जास्त प्रभाव असतो. याचे ३ कारणे आहेत: एक मोठ्या भौगोलिक क्षेत्रफळामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीची विफुलता, दोन : वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी अन्न-धान्याचे जास्त उत्पादन करण्यासाठी विस्तृत क्षेत्रफळ उपयोगी येऊ शकते आणि तीन : मोठ्या भूप्रदेशावर ताबा मिळवणे शत्रू राष्ट्रांना कठीण सहज शक्य नसते. भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार करता जगातील राष्ट्रांमध्ये भारताचा ७ वा क्रमांक लागतो. आंतराष्ट्रीय राजकारणावर वर्चस्व असणाऱ्या अमेरिका, रशिया आणि चीन या देशांचा भौगोलिक आकार सुध्दा विशाल आहे. मोठ्या भौगोलिक आकारामुळे भारतासारख्या राष्ट्रांशी अनेक राष्ट्रांच्या सीमा असल्यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण अधिक

